महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ)(ब)(दोन)

सहवाचन कलम ७३अअअ(३)अंतर्गत आदेश

३५०८

जा.क्र.उपनिश-२/गृह/क ७७अ/आदेश/ /२०१७

उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२

दिनांक- २०/८/१७

१. ज्याअर्थी , इमारत डी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या नागपूर र न १३४२ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे तरतुदीनुसार नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था असुन महाराष्ट्र सहकारी संस्था धिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ आणि संस्थेचे उपविधीतील तरतुदीन्वये उक्त संस्थेचे कामकाज चालविणे आवश्यक आहे. सदरहू संस्था या कार्यालयाचे अधिकार क्षेत्रात येते, आणि

२. ज्याअर्थी, उक्त संस्थेमार्फत निवडणूक नियम क्र ५(२) मधील तरतुदीनुसार नमुना ई-२ नुसार संस्था सदस्यांचा पदावधी संपुष्टात आलेला आहे., आणि

३. ज्याअर्थी, या कार्यालयाचे पत्र क्र उपनिश-२/गृहनिर्माण/क७७/आदेश३६१७/२०१७, दि-२/८/२०१७ अन्वये आपणास निवडणुकीसंबंधाने नवीन सभासद करणे, संस्थेचा संपूर्ण दस्ताऐवज तयार करणे, संस्थेचे लेखापरिक्षण करुन अहवाल कार्यालयास सादर करणे.,

४. ज्याअर्थी, वर नमुद केल्याप्रमाणे उक्त संस्थेच्या विद्यमान संचालक मंडळ सदस्यांचा पदावधी संपुष्टात येण्यापुर्वी उक्त संस्थेने प्रक्रिया सुरु केलेली नाही. त्यामुळे उक्त संस्थेचे संचालक मंडळ त्यांचा पदावधी संपल्यावरही कार्यरत आहे., आणि

५. ज्याअर्थी, उपरोक्त नमुद परिस्थिती व घटनाक्रम लक्षात घेता, कलम ७७ (अ)(ब)(२) तथा कलम ७३ अअअ (३)चे तरतुदीनुसार उक्त संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ सदस्यांचा पदावधी संपुष्टात आल्याने तसेच संस्थेने संस्थेशी संबंधीत दस्ताऐवज पुर्ण न केल्याने उक्त संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली असुन अशा समितीतीला पुढील कालासाठी काम करण्याचा कायदेशीर अधिकार राहत नाही.

६. त्याअर्थी, उपरोक्त नमुद वस्तुस्थिती व वैधानिक कारणांमुळे कलम ७७ (अ)(ब)(२) तथा कलम ७३ अअअ (३)चे तरतुदीनुसार उक्त संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ सदस्यांचा पदावधी संपुष्टात आल्याने समिती अल्पमतात आहे किंवा नाही याचा बोध होत नसल्याने व्यवस्थापनात पोकळी निर्माण झालेली आहे व त्यामुळे विद्यमान संचालक मंडळाची निवडणुक प्रक्रिया पुर्ण होऊन नविन समिती पदग्रहण करेपर्यंत इमारत डी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या नागपूर या संस्थेचे विद्यमान संचालक मंडळाऐवजी प्राधिकृत अधिका-याची नियुक्ती करणे योग्य व विधीग्राह्य ठरेल. अशी माझी ठाम खात्री झाली असल्याने मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे-

-:आदेश:-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ७७ (अ)(ब)(दोन )तथा कलम७३ अअअ(३) अंतर्गत असलेली तुंद व महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचे आदेश क्रमांक सीएसएल/१४९३/११६२/सीआर-४७/१५-सी. ७/८/१९९३ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी डी के बेदरकर, उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२ याद्वारे इमारत डी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. नागपूर र न १३४२विद्यमान संचालक मंडळ सदस्यांच पदावधी संपुष्टात आल्याने व वैधानिकदृष्ट्या उक्त संस्थेने लेखापरिक्षण, सभा, संस्था ऑनलाईन तथा रिटर्न व नवीन सभासद न केल्याने व्यवस्थापनात पोकळी निर्माण झाल्यामुळे विद्यमान संचालक मंडळाऐवजी श्री अमित अ सुर्यवंशी, सहाय्यक सहकार अधिकारी अंतर्गत उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे.

सदरहू आदेश मी, माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक २० /०९/२०१७ रोजी पारित करित आहे.

(डी के बेदरकर)

उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२

प्रती,

श्री अमित अ सुर्यवंशी, सहाय्यक सहकार अधिकारी अंतर्गत उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२ यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी तातडीने उक्त संस्थेचा प्राधिकृत अधिकारी पदाचा पदभार तात्काळ ग्रहण करुन संस्थेचे लेखापरिण, ऑनलाईन, संस्थेचा दस्तऐवज इ प्रक्रीया पुर्ण करुन ६ महिण्याच्या आत निवडणुक प्रक्रिया पार पाडावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रतिलीपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता-

१. मा जिल्हा विशेष लेखापरिक्षण वर्ग-१, सहकारी संस्था, नागपूर
२. संबंधीत संचालक मंडळा सदस्य/संस्था सभासद. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . (नावाने)
३. संस्थेच्या नोटीस बोर्डवर

प्रतीलीपी माहितीस्तव सादर

१. मा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था म रा पुणे
२. मा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
३. मा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर

(डी के बेदरकर)

उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२

-:आदेश:-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ७७ (अ)(ब)(दोन )तथा कलम७३ अआअ(३) अंतर्गत असलेली तुद व महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचे आदेश क्रमांक सीएसएल/१४९३/११६२/सीआर-४७/१५-सी, ७/८/१९९३ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी डी के वेदरकर, उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२ याद्वारे इमारत डी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या, नागपूर र न १३४२विद्यमान संचालक मंडळ सदस्यांच पदावधी संपुष्टात आल्याने व वैधानिकदृष्टया उक्त संस्थेने लेखापरिक्षण, सभा, संस्था ऑनलाईन तथा रिटर्न व नवीन सभासद न केल्याने व्यवस्थापनात पोकळी निर्माण झाल्यामुळे विद्यमान संचालक मंडळाऐवजी श्री अमित अ सुर्यवंशी, सहाय्यक सहकार अधिकारी अंतर्गत उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे.

सदरहू आदेश मी, माझे सही व शिक्यानिशी आज दिनांक २० /०९/२०१७ रोजी पारित करित आहे.

(डी के वेदरकर)

उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२

प्रती,

श्री अमित अ सुर्यवंशी, सहाय्यक सहकार अधिकारी अंतर्गत उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२ यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी तातडीने उक्त संस्थेच्या प्राधिकृत अधिकारी पदाचा पदभार तात्काळ ग्रहण करुन संस्थेचे लेखापरिण, ऑनलाईन, संस्थेचा दस्तऐवज इ प्रक्रीया पुर्ण करुन ६ महिण्याच्या आत निवडणुक प्रक्रिया पार पाडावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रतिलीपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता-

१. मा जिल्हा विशेष लेखापरिक्षण वर्ग-१, सहकारी संस्था, नागपूर
२. संबंधीत संचालक मंडळ सदस्य/संस्था सभासद .................................. (नावाने)
३. संस्थेच्या नोटीस बोर्डवर

प्रतीलीपी माहितीस्तव सादर

१. मा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था म रा पुणे
२. मा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
३. मा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर

(डी के वेदरकर)

उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२